# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(द) [28(2)(r)] नुसार अध्यापक गटाने त्यांच्या मधून (प्राचार्य आणि मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक यांच्याखेरीज) दहा (१०) अध्यापकांची अधिसभेवरील निवडणूक**

## निवडणूक सूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(द) [28(2)(r)] मधील तरतूदीनुसार अध्यापक गटाने त्यांच्या मधून (प्राचार्य आणि मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक यांच्याखेरीज) दहा (१०) अध्यापक अधिसभेवर सदस्य म्हणून निवडून देण्यासाठी दिनांक १७ मे, २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाने राजपत्राद्वारे प्रसिध्द केलेल्या सन २०१७ चा एकरुप परिनियम क्रमांक ०१ मधील मुद्दा क्रमांक ०९ नुसार ही निवडणूक सूचना देण्यात येत आहे.**

१) सोमवार, दिनांक ०४ डिसेंबर, २०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या तात्पुरत्या मतदार यादीस व प्राप्त दुरुस्त्या विचारात घेऊन मा. कुलगुरु यांनी मान्य केलेल्या व गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम मतदार यादीप्रमाणे या निवडणूका घेण्यात येत आहेत.

२) निवडणुकीसाठीच्या जागा : एकूण जागा १०, पैकी ५ जागा **खुल्या** प्रवर्गासाठी असून ५ जागा खालीलप्रमाणे राखीव प्रवर्गासाठी आरक्षित आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती (Scheduled Caste) - ०१ जागा | (२) | अनुसूचित जमाती (Scheduled Tribes) - ०१ जागा |
| (३) | निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती (De-notified Tribes (Vimukta Jatis) or Nomadic Tribes) - ०१ जागा | (४) | इतर मागास वर्ग (Other Backward Classes) - ०१ जागा |
| (५) | महिला (Woman) - ०१ जागा | | |

**३) सदर निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | उमेदवारी अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्रमांक १(१०)(२)(ख) नूसार निवडणुकीच्या दिनांकाच्या पूर्ण १६ दिवस अगोदर) | गुरुवार, दि. ०४ जानेवारी, २०१८ (वेळ : सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | निवडणूक विभाग, मुख्य इमारती शेजारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| २ | उमेदवारी अर्जांची छाननीचा दिनांक, वार व वेळ | शुक्रवार, दि. ०५ जानेवारी, २०१८ (वेळ : सकाळी ११.०० वाजता) | संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| ३ | उमेदवारी अर्ज मागे घेण्यासंबंधी लेखी कळविण्याचा दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(५) नुसार) | सोमवार, दि. ०८ जानेवारी, २०१८ (वेळ : सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | निवडणूक विभाग, मुख्य इमारती शेजारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |

| अ.क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| ४ | निवडणूक दिनांक, वार व वेळ<br><br>(एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ९ नुसार) | रविवार, दि. २१ जानेवारी, २०१८ (वेळ : सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | या निवडणूक सूचनेस जोडलेल्या **परिशिष्ट – १** मधील मतदान केंद्रावर सदर निवडणूक घेण्यात येईल. |
| ५ | मतपत्रिकांची छाननी व मतमोजणीचा दिनांक, वार, वेळ व स्थळ | मंगळवार, २३ जानेवारी, २०१८ (वेळ : सकाळी ८.०० वाजता पासून) | मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |

**४) उमेदवारी अर्ज /उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना :**

उमेदवारी अर्ज व उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावरील Downloads -> Download Nomination Form या लिंकवर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करुन घेता येईल. उमेदवारी अर्ज सादर करण्याच्या विहित वेळेपूर्वी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावरील Nominations -> Pay Nomination fees या लिंकमार्फत उमेदवारी अर्जाचे शुल्क नापरतावा (Non - refundable) रु. १०००/- (रुपये एक हजार फक्त) व उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज सादर करण्याच्या विहित वेळेपूर्वी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचे नापरतावा (Non - refundable) शुल्क रु. २००/- (रुपये दोनशे फक्त) ऑनलाईन पध्दतीने भरता येईल किंवा सदर संबंधित अर्जाचे शुल्क "बँक ऑफ महाराष्ट्र" / "एच.डी.एफ.सी. बँक" या बँकेत चलनाद्वारे भरता येईल. अर्जासोबत संबंधित आवश्यक कागदपत्रे व चलनाद्वारे अथवा ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या शुल्काची पावती जोडून असे अर्ज निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे विहित वेळेत जमा करावेत.

**टिप : ऐनवेळेला ऑनलाईन शुल्क भरताना तांत्रिक समस्या उद्भवल्यास किंवा चलनाद्वारे शुल्क भरताना बँकेच्या कामकाजाचे दिवस व वेळ पाळली न गेल्यास व त्यामुळे उमेदवाराला विहित वेळेत उमेदवारी अर्ज / उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज भरता न आल्यास त्याला विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.**

५) **उमेदवारांसाठी आवश्यक पात्रता :**

**क) उमेदवार हा पीएच.डी. पदवीधारक असावा आणि एकूण किमान दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा,**

**किंवा**

**एकूण किमान पंधरा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा.**

**ख) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.**

६) योग्यरितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी सर्व कागदपत्रांसह दाखल केलेले, उमेदवारी अर्जच विचारात घेतले जातील.

७) नामनिर्देशनपत्रांवर, मत देण्यासाठी हक्कदार असलेल्या दोन मतदारांकडून दिनांक लिहून स्वाक्षरी करण्यात येईल आणि त्यामध्ये, दिनांक, नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची पूर्ण नावे, पत्ते व पदनामे, कोणतीही असल्यास, आणि स्वाक्षरीकर्त्या मतदारांचा व नामनिर्देशित उमेदवारांचा मतदार क्रमांक यांचा समावेश असेल. कोणत्याही व्यक्तीला, त्याने नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करुन व दिनांक लिहून त्याची संमती दिल्याखेरीज निवडणुकीतील उमेदवार म्हणून नामनिर्देशित केले जाणार नाही. कोणतीही व्यक्ती, त्याच्या स्वतःच्या नामनिर्देशनामध्ये एकतर सूचक किंवा अनुमोदक असणार नाही. परंतु, जेथे तीनपेक्षा कमी मतदार असतील तेथे उमेदवार, त्याच्या नामनिर्देशनामध्ये स्वतः सूचक व अनुमोदक असू शकेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(३))

८) या निवडणूक सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटींचे अनुपालन करीत नसलेले नामनिर्देशनपत्र अवैध असेल आणि ते फेटाळले जाईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(४))

९) उमेदवारास निवडणुकीतून माघार घेण्याचा पर्याय खुला असेल : परंतु, अशा उमेदवारास निवडणुकीच्या वेळापत्रकात विहित केलेल्या दिनांकास सायंकाळी ५ वाजण्यापूर्वी विद्यापीठाच्या कार्यालयात व्यक्तिशः किंवा त्याने लिखित स्वरुपात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत त्याने स्वाक्षरीत केलेला नामनिर्देशन मागे घेतल्याचा अर्ज सादर करावा लागेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(५))

१०) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवार नसतील तर ते सर्व उमेदवार, निवडणुकीचा निकाल जाहिर करण्याच्या दिनांकास बिनविरोध निवडून आल्याचे जाहिर करण्यात येईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(८))

११) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१२) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २८ एप्रिल, २०१७ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचेच नामनिर्देशन अर्ज ग्राह्य धरण्यात येतील. शासन राजपत्र, शासनाने यासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे तसेच पात्रता शर्तीच्या ग्राह्यतेसंबंधीच्या नियमांबाबतच्या विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १८१/२०१७, दि. १८ ऑगस्ट, २०१७ यांची प्रत विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर Act/Statutes व Notifications/Circulars या लिंकवर उपलब्ध आहे.

१३) उमेदवारी अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित नामनिर्देशनपत्र 'अवैध' ठरविण्यात येईल (मतदार नोंदणीच्या वेळी जोडलेली कागदपत्रे उमेदवारी अर्जाकरिता ग्राह्य धरली जाणार नाहीत).

**१. पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र, ज्या उमेदवाराचा एकूण किमान दहा (१०) वर्षे अध्यापनाचा अनुभव आहे. ज्या उमेदवाराचा एकूण किमान पंधरा (१५) वर्षे अध्यापनाचा अनुभव आहे त्यांना पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र जोडण्याची आवश्यकता नाही,**

**२. एकूण किमान दहा (१०) वर्षे / एकूण किमान पंधरा (१५) वर्षे (जे लागू असेल ते) अध्यापनाच्या अनुभवाचे विहित नमून्यातील प्रमाणपत्र. (परिपत्रक क्रमांक १८१/२०१७, दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ च्या परिशिष्ट क्रमांक ५ प्रमाणे) आणि विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत / प्रती,**

**३. विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाचे एकूण किमान पाच वर्षे अनुभवाचे विहित नमून्यातील प्रमाणपत्र. (परिपत्रक क्रमांक १८१/२०१७, दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ च्या परिशिष्ट क्रमांक १ प्रमाणे),**

**४. नावात बदल असल्यास शासन राजपत्र किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र.**

१४) उमेदवारी अर्ज छाननी आणि मतमोजणीच्यावेळी स्वतः उमेदवार किंवा त्याने लेखी पत्राव्दारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील मतदार असलेली व्यक्ती प्रतिनिधी म्हणून एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल.

१५) मतदारांनी मतदार नोंदणीच्यावेळी निवडलेल्या व त्यानुसार अंतिम मतदार यादीमध्ये नमूद केलेल्या मतदान केंद्रावरच मतदान करावयाचे आहे. मतदान केंद्र कोणत्याही परिस्थितीत बदलून देण्यात येणार नाही. परंतु एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १३ नुसार निवडणुकीच्या कामावर असणा-या व्यक्तींना, ते ज्या ठिकाणी निवडणुकीच्या कामावर आहेत अशा ठिकाणी आपले मत नोंदविण्याची मुभा असेल.

१६) मतदानास येताना मतदारांनी स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र उदा. शासकीय / निमशासकीय सेवकांचे कार्यालयीन ओळखपत्र, आधारकार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले फोटोसहित ओळखपत्र किंवा आयकर अधिका-यांनी (Income Tax) दिलेले फोटोसहित ओळखपत्र (PAN Card) किंवा तत्सम फोटोसहित ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. **मतदान केंद्रावरील निवडणूक अधिका-यांना हे ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतदारांना मतपत्रिका मिळणार नाही.**

१७) ही निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधित्व पध्दतीनुसार एकक संक्रमणीय मतानुसार परिनियमांव्दारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल. या निवडणुकीसाठी मतदान हे पसंतीनुसार प्राधान्यक्रम या पध्दतीने करावयाचे आहे. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ५ व ६)

मा. कुलगुरु यांच्या आदेशावरुन

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ क्र. साफुपुविनि/२८(२)(द)/ ३२८ )
दिनांक : २६ डिसेंबर, २०१७ )
)

( डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम )
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत : सर्व संबंधित मतदार.**

निवडणूक सूचना जा. क्र. - साफुपुविनि / २८(२)(द) /३२८, दिनांक २६ डिसेंबर, २०१७ चे परिशिष्ट – १ (पाने १ ते ३)

# प्राचार्य, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक व अभ्यासमंडळे या गटांसाठीच्या मतदान केंद्राची यादी

| पुणे शहर व जिल्हा | |
|---|---|
| मतदान केंद्र क्रमांक | मतदान केंद्राचे नाव |
| १. | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, आवार |
| २. | फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे - ४११ ००४. |
| ३. | एच.व्ही.देसाई कॉलेज, ५९६ बुधवार पेठ, पुणे - ४११ ००२. |
| ४. | एम.ई.एस.इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट करिअर कोर्सेस, १३१, मयूर कॉलनी, कोथरुड, पुणे - ४११ ०२९. |
| ५. | सी.वाय.दांगट (पाटील) शिक्षण आणि क्रिडा मंडळाचे, शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय, वडगाव बु. पुणे-४१ |
| ६. | पी.व्ही.जी.कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, ४४ विद्यानगरी, पर्वती दर्शन, पुणे - ४११ ००९. |
| ७. | नौरोसजी वाडीया कॉलेज, प्रिन्सिपल व्ही.के.जोग पथ, पुणे - ४११ ००१. |
| ८. | अण्णासाहेब मगर कॉलेज, हडपसर, पुणे - ४११ ०२८. |
| ९. | महात्मा फुले कॉलेज, पिंपरी वाघिरे, पुणे - ४११ ०१७. |
| १०. | इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर ४१३ १०६, जि.पुणे |
| ११. | नायगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, दौंड - ४१३ ८०१. जि.पुणे |
| १२. | तुळजाराम चतुरचंद कॉलेज, बारामती - ४१३ १०२, जि.पुणे |
| १३. | अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, सासवड - ४१२ ३०१, जि.पुणे |
| १४. | अनंतराव थोपटे महाविद्यालय, भोर - ४१२ २०६, जि.पुणे |
| १५. | डॉ.बी.एन.पुरंदरे कला आणि श्रीमती एस.जी.गुप्ता वाणिज्य महाविद्यालय, लोणावळा - ४१० ४०३, जि.पुणे |
| १६. | सी.टी.बोरा कॉलेज, शिरुर - ४१२ २१०, (घोडनदी) जि.पुणे |
| १७. | हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरुनगर - ४१० ५०५, ता.खेड, जि.पुणे |
| १८. | अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे |
| १९. | श्री. शिवछत्रपती कॉलेज, जुन्नर - ४१० ५०२, जि.पुणे |

| अहमदनगर व जिल्हा | |
|---|---|
| **मतदान केंद्र क्रमांक** | **मतदान केंद्राचे नाव** |
| २०. | पेमराज सारडा कॉलेज, अहमदनगर - ४१४ ००१ |
| २१. | आर.बी.एन.बी. महाविद्यालय, ता.श्रीरामपुर - ४१३ ७०९, जि.अहमदनगर |
| २२. | के.जे.सोमय्या कॉलेज, ता.कोपरगाव - ४२३ ६०१, जि.अहमदनगर |
| २३. | सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, ता.संगमनेर - ४२२ ६०५, जि.अहमदनगर |
| २४. | पी.व्ही.पी आर्टस् सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, प्रवरानगर - ४१३ ७१३. ता.राहाता, जि.अहमदनगर |
| २५. | दादा पाटील महाविद्यालय, कर्जत - ४१४ ४०२, जि.अहमदनगर |
| २६. | बाबुजी आव्हाड कला व वाणिज्य महाविद्यालय, ता.पाथर्डी - ४१४ १०२, जि.अहमदनगर |
| २७. | एस.एस.एस.पी.एम.कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राहुरी - ४१३ ७०५, जि.अहमदनगर |
| २८. | श्री. ज्ञानेश्वर महाविद्यालय, ता.नेवासा - ४१४ ६०३, जि.अहमदनगर |
| २९. | अकोले तालुका शिक्षण संस्थेचे अगस्ती कला व वाणिज्य आणि दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, ता. अकोले ४२२ ६०१, जि.अहमदनगर |
| ३०. | न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, पारनेर - ४१४ ३०२, जि.अहमदनगर |
| ३१. | न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, शेवगांव - ४१४ ५०२, जि.अहमदनगर |
| ३२. | श्री.छत्रपती महाविद्यालय, श्रीगोंदा - ४१३ ७०१ जि.अहमदनगर |
| ३३. | जामखेड महाविद्यालय, जामखेड -४१३ २०१, जि.अहमदनगर |

निवडणूक सूचना जा. क्र. - साफुपुविनि / २८(२)(द) /३२८, दिनांक २६ डिसेंबर, २०१७ चे परिशिष्ट – १

# नाशिक जिल्हा

| मतदान केंद्र क्रमांक | मतदान केंद्राचे नाव |
|---|---|
| ३४. | एच.पी.टी. कला अँण्ड सायन्स महाविद्यालय,<br>नाशिक - ४२२ ००५ |
| ३५. | लोकनेते व्यंकटराव हिरे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,<br>पंचवटी,<br>नाशिक-४२२ ००३ |
| ३६. | आर.एन.सी.कला,जे.डी.बी. वाणिज्य ॲण्ड एन.एस.सी.विज्ञान महाविद्यालय, नाशिक रोड, नाशिक- ४२२ १०१ |
| ३७. | गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला व भगवत वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,<br>सिन्नर- ४२२ १०३, नाशिक |
| ३८. | एन.डी.एम.व्ही.पी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,<br>मनमाड- ४२३ १०४, ता.नांदगाव,<br>जिल्हा- नाशिक |
| ३९. | कर्मवीर आबासाहेब ऊर्फ एन.एम.सोनवणे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,<br>सटाणा- ४२३ ३०१, ता.बागलाण, जि.नाशिक |
| ४०. | के.के.वाघ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपळगांव बसवंत- ४२२ २०९, ता.निफाड, जि.नाशिक |
| ४१. | स्वामी मुक्तानंद विज्ञान महाविद्यालय, येवला- ४२३ ४०१, जि.नाशिक |
| ४२. | महाराजा सयाजीराव गायकवाड कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,<br>मालेगांव कॅम्प- ४२३१०५, जि.नाशिक |
| ४३. | कळवण एज्युकेशन सोसायटीचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कळवण- ४२३५०१, जि.नाशिक |
| ४४. | कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळा- ४२३१०२, जि.नाशिक |
| ४५. | डांग सेवा मंडळाचे दादासाहेब बीडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, पेठ, जि.नाशिक-४२२२०८ |